महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD . PUNE - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - sscboardpune@gmail.com |
| --- | --- | --- |
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 / 25536712(OFF) | Website- www.sscboardpune.in |

क्रमांक पुविमं/माध्य./क/300
पुणे–४११००५–
दिनांक– १५/०१/२०२५.
१७

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा/विद्यालय
पुणे,अहमदनगर,सोलापूर .

**विषय:**–सन–२०२५ या वर्षी इ.10 वी च्या परीक्षेला प्रविष्ट झालेल्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतच्या प्रस्तावास मुदतवाढ देण्याबाबत...

**संदर्भ:**– १.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शा.नि. संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी–२ दि.२४/११/२०१७
२.क्र.रा.मं/परीक्षा–७/२७२७/ दिनांक ०९/०७/२०२४.रोजीचे पत्र.
३.या कार्यालयाचे क्र.पुविम/शाखा–क/आवेदन/६३७६/ दिनांक ०५/१२/२०२४.रोजीचे पत्र.
४. या कार्यालयाचे क्र.पुविम/शाखा–क/आवेदन/६७३८/ दिनांक २३/१२/२०२४.रोजीचे पत्र.
५. क्र.रा.मं/परीक्षा–७/१५३/ दिनांक १४/०१/२०२५.रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या **संदर्भ क्र. १** मधील शासन निर्णय नुसार तसेच **संदर्भ क्र.३ व ४** या कार्यालयाच्या परिपत्रानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याचे प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करण्याची अंतीम मुदत **दिनांक १५/०१/२०२५** पर्यंत देण्यात आली होती.

परंतु **संदर्भीय क्र.५** वरील राज्य मंडळ पुणे यांच्या आदेशानुसार सदरच्या प्रस्ताव सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी सदरची मुदतवाढ खालील **तक्ता 'अ'** नुसार

| अ.क्र | तपशील | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह सुधारित अंतिम दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १. | विद्यार्थ्यांनी **शाळेकडे** प्रस्ताव सादर करणे | दिनांक १५ डिसेंबर | शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ |
| २. | शाळांनी **विभागीय मंडळाकडे** प्रस्ताव सादर करणे | दिनांक १५ जानेवारी | शुक्रवार, दि. ३१ जानेवारी २०२५ |

तरी उपरोक्त **तक्ता 'अ'** नुसार सर्व शाळानी **दि.२४ जानेवारी २०२५** रोजी पर्यंत विद्यार्थीकडून प्रस्ताव स्विकारून बैठक क्रमांक निहाय प्रस्ताव **दि.३१ जानेवारी २०२५** पर्यंत मंडळात सादर करण्यात यावे. विहीत मुदतीनंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

→ P.T.O.

CamScanner

सूचना–१- सदर प्रस्ताव बैठक क्रमांकनिहाय क्रमवार लावून बंच तयार करून सादर करावेत

२- प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रस्तावावर बैठक क्रमांक नमूद करावा व प्रस्तावासोबत प्रवेशपत्र जोडण्यात यावे.

३- चित्रकला प्रस्ताव,शास्त्रीय कला,लोककला असे प्रस्तावांचे स्वतंत्रपणे बंच तयार करून मंडळाकडे सादर करावेत. त्यासंबधीचे शाळा प्रमुखांचे मुखपत्र पात्र विद्यार्थी यादी खाली नमून्यात प्रत्येक बंचसोबत स्वतंत्रपणे सादर करावी.

४- चित्रकला,शास्त्रीयकला प्रस्तावांची प्रमाणपत्रे मुख्याध्यापकांनी प्रमाणित करूनच सोबत जोडावीत.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005.

प्रत माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीसाठी

१-विभागीय शिक्षण उपसंचालक

२-शिक्षणाधिकारी(माध्यमिक) पुणे,अहमदनगर,सोलापूर

CamScanner